कार्यालय, शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, नागपूर, सिव्हिल लाईन, नागपूर

-: नमुना-दोन :-

ग्राम : नागपूर शहर
दुरध्वनी : ०७१२-२५६०९०२
ई मेल :- ssanagpur 1 @ yahoo.com.in
फॅक्स :- ०७१२-२५६०९०२

जावक क्र.जि प ना प्रा/RTE/शा.मा./का क्र.२५ब/ 37/२०२०
कार्यालय:जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.)जिल्हा परिषद नागपूर
विभाग: नागपूर, राज्य-महाराष्ट्र
दिनांक :- 20/01/२०२०

प्रति,

अध्यक्ष/ सचिव
जे.एस. डब्ल्यु, एज्युकेशन सोसायटी,
कळमेश्वर.

**विषय:- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११ पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपल्या **दिनांक १३.०१.२०२०** च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी याआधारे **मी चिंतामण वंजारी, शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद नागपूर दिनांक ०१.०४.२०१९ पासून दिनांक ३१.०३.२०२२** पर्यत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ते ८ वी करीता जिंदल विदया मंदीर, जे.एस. डब्ल्यु, कर्मचारी वसाहत, कळमेश्वर ता. कळमेश्वर, (इंग्रजी - माध्यम) या शाळेस तात्पुरती** मान्यता देत आहे.
**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२) बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतूदीचे शाळा पालन करील.
३) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ टक्के मर्यादेपर्यत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४) परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५) संस्था/ शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा तिच्या माता - पित्यास किंवा पालकांना भाग पाडणार नाही.
६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म जात किंवा वंश जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकण्यास येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.
(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल, परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.
(आठ) शिक्षकाने/ शिक्षिकाने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुतवून घेऊ नये याची सुनिश्चिती शाळा करील.

PRINCIPAL
Jindal Vidya Mandir
JSW Housing Colony, Kalmeshwar

Manager
Jindal Vidya Mandir
JSW Housing Colony, Kalmeshwar

८) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील, मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

१. शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- ८१९६ चौ. मि. (२ एकर)
२. एकूण बांधकाम क्षेत्रफळ:- २३२५ चौ. मि.
३. खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ:- ५९९६ चौ. मि.
४. शाळेतील एकुण खोल्याची संख्या :- वर्ग खोल्याची संख्या :- ३०
५. कार्यालय नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली:- आहे.
६. मुलांसाठी व मुलीसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल:- आहे (मुलांसाठी स्वच्छता गृहाची संख्या- व मुत्रीघराची संख्या-२०) (मुलींसाठी स्वच्छता गृहाची संख्या- व मुत्रीघराची संख्या-१०)
७. पिण्याची पाण्याची सुविधा:- आहे. ( २ वॉटर कुलर)
८. दुपारचे जेवन शिजविण्यासाठी स्वयंपाकघर:- आहे.
९. अध्यापन-अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता :- आहे.
१०. वाचन साहित्य विनासायस उपलब्ध:- (पुस्तकांची संख्या-१८०२) ग्रंथालय आहे.
११. सर्व सुविधा विना अडथळा उपलब्ध आहेत काय?:- होय.
१२. शाळेला संरक्षण भिंत आहे काय:- आहे.

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त् व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणत्याही नफा मिळण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षत व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक २७०९०३१०७१० असा आहे. हा या कार्यालयाशी कोणत्याही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा यांची नोंद घ्यावी.

१७) शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासयाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रूटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९) बालकांच्या मोफत व सकतीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ प्रमाणे शाळेला आवश्यक असणा-या उपरोक्त त्रूटीची पुर्तता दिनांक ३१.०३.२०२२ पर्यत पूर्ण करण्यात याव्यात अन्यथा आपल्या शाळेची मान्यता त्यापुढे आपोआप संपुष्टात येईल.

(चिंतामण वंजारी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर

प्रतिलीपी :- मुख्याध्यापक, जिंदल विद्या मंदीर, जे.एस. डब्ल्यु, कर्मचारी वसाहत, कळमेश्वर ता. कळमेश्वर, जि. नागपूर.यांना माहीतीस अग्रेषित.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर

PRINCIPAL
Jindal Vidya Mandir
JSW Housing Colony, Kalmeshwar

Manager
Jindal Vidya Mandir
JSW Housing Colony, Kalmeshwar